

पुण्य नगरी

▮ गुरुवार, ८ मे २०२५

भारत दहशतवादी हल्ल्यांना वेळीच उत्तर देत आहे; पण पहलगाममधील नुकत्याच झालेल्या हल्ल्याचे स्वरूप आणि पाकिस्तानी सरकारची या दहशतवाद्यांना मदत विचारात घेता आपल्या जवानांनी केलेले कार्य खरोखरच वाखाणण्याजोगे आहे.

- मेजर सुनीता भोसले,
असोसिएट एनसीसी ऑफिसर

रात्री सैन्य कारवाईद्वारे जिहाद्यांना कंठस्नान घातले आणि त्यांच्या कर्माची फळे त्यांना मिळाली व पुढे मिळत राहतील. ही कामगिरी अतिशय कौतुकास्पद आहे. सिंधू जलसंधी रद्दपासून ऑपरेशन सिंदूरपर्यंत प्रत्येक ठिकाणी पाकिस्तानच्या मुसक्या आवळण्यात भारतीय सरकार यशस्वी झाले आहे.

- डॉ. अजिंक्य पत्रावळे, सहायक प्राध्यापक

ANO OPINION REGARDING PAHALGAM ATTACK



तरुण भारत संवाद

सोमवार, २३ जून २०२५

# आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त शहरात योगाभ्यास

## 'योगामुळे शरीराची लवचिकता वाढते, ताणतणाव कमी होतो'

कोल्हापूर

शरीर व मन निरोगी राहण्यासाठी सर्वांनी नियमितपणे योगा करणे आवश्यक आहे. योगाचे महत्व अनमोल आहे. योगामुळे शरीराची लवचिकता वाढते, तणाव कमी होतो, एकाग्रता आणि आंतरिक शांतता लाभते. योगामुळे आपणास सुदृढ शरीरासोबत परिपक्व मनाची निर्मिती करता येते. असे मत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. योगदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

विवेकानंदमधील कार्यक्रमात डॉ. राजश्री पाटील, योग प्रशिक्षिका, आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यावेळी देविका माने, शिवदिप वेदपाठक, अभिजीत यांनी योग प्रात्यक्षिके घेतली. डॉ. श्रुती जोशी, डॉ. विकास जाधव, एन.सी.सी. प्रमुख मेजर सुनिता भोसले, एन.एस.एस विभागाचे डॉ.संदीप पाटील यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, ६ महाराष्ट्र एनसीसी गर्ल्स् बटालियनचे कर्नल संधान मिश्रा यांचे या कार्यक्रमासाठी मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक आणि स्वागत जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव यांनी केले. प्रा. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले. सुत्रसंचालन सायली वडकर यांनी केले.

जागतिक योग दिन विशेष

INTERNATIONAL YOGA DAY

पुण्य नगरी | रविवार, २२ जून २०२५

# निरोगी शरीर, मनासाठी योग आवश्यक : प्राचार्य कुंभार

## विवेकानंद कॉलेजमध्ये योग दिन उत्साहात

कोल्हापूर : शरीर व मन निरोगी राहण्यासाठी सर्वांनी नियमितपणे योगा करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते.

योग प्रशिक्षिका डॉ. राजश्री पाटील यांनी मार्गदर्शन केले. देविका माने, शिवदीप वेदपाठक, अभिजित यांनी कृती आधारित योगासने विद्यार्थ्यांकडून करवून घेतली. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. श्रुती जोशी, जीमखानाप्रमुख डॉ. विकास जाधव, एनसीसीप्रमुख मेजर सुनीता भोसले, एनएसएस विभागाचे डॉ. संदीप पाटील यांनी केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, ६ महाराष्ट्र एनसीसी गर्ल्स बटालियनचे कर्नल संधान मिश्रा यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रास्ताविक डॉ. विकास जाधव यांनी केले. आभार प्रा. सुप्रिया पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन एनसीसी कॅडेट सायली वडकर यांनी केले. रजिस्टार एस. के. धनवडे यांचे सहकार्य लाभले.

HEALTH PROGRAM

पुढारी MY कोल्हापूर | शुक्रवार, ६ जून २०२५

संक्षिप्त

# विवेकानंद महाविद्यालयाच्या छात्रांना 'एनसीसी' स्कॉलरशिप


कोल्हापूर : 'एनसीसी' मुख्यालय दिल्लीतर्फे ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनच्या विवेकानंद कॉलेजच्या छात्रांना २०२४-२५ करिता एनसीसी कॅडेट वेल्फेअर सोसायटी व राज्य सरकार शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. त्याबद्दल प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यात रिद्धी रावराणे, साक्षी बच्चे, वैष्णवी ढेंगे, दीक्षा लोहार, श्रावणी अडसुळ यांना कॅडेट वेल्फेअर सोसायटी शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. झाल्याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्रबंधक एस. के. धनवडे यांनी अभिनंदन केले. छात्रांना महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, मेजर सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन लाभले.

CADET WELFARE SCHOLARSHIP

# हॅलो प्रभात


## विवेकानंद कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

कोल्हापूर : हॅलो प्रभात



महाराष्ट्राला संतांची, शाहिरांची, सामाजिक व शैक्षणिक सुधारकांची मोठी परंपरा आहे. त्यामुळेच विविधतेमधील एकता महाराष्ट्र राज्यात देशाच्या एकात्मतेसाठी टिकून राहिलेली आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेसाठी अनेकांनी बलिदान दिले. त्यामुळे स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची स्थापना होणेसाठी कोल्हापूरमधून जनआंदोलन उभे राहिले. यानिमित्त उभारण्यात आलेल्या महिला आंदोलनात संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांचाही महत्वाचा सहभाग होता. महाराष्ट्राची कला, क्रीडा, उद्योग, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात प्रगती होत आहे. आजच्या युवकांनी राज्य ऐक्याच्या भावनेतून देशाला प्रगतीपथाकडे न्यावे. असे विचार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी ध्वजारोहण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मांडले.

विवेकानंद कॉलेजमध्ये संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य साळुंखे यांच्याहस्ते ध्वजारोहण करणेत आले. संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे व संस्थेचे सी. ई. ओ. कौस्तुभ गावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी एन. सी. सी. च्या विद्यार्थ्यांनी भारतीय ध्वजास मानवंदना दिली.

यावेळी संस्था परिसरातील डॉ. बापूजी साळुंखे इंजिनिअरींग कॉलेज, डॉ. बापूजी साळुंखे हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिटयूट, सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेज, न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, संस्था कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.


Main Edition
May 04, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com


1st MAY MAHARASHTRA DAY CELEBRATION

तरुण भारत संवाद
गुरूवार, ५ जून २०२५

## विवेकानंदच्या छात्रांना एनसीसी स्कॉलरशिप

कोल्हापूर : एन.सी.सी. मुख्यालय दिल्लीतर्फे ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनच्या विवेकानंदच्या छात्रांना २०२४-२५ करीता एन.सी.सी. कॅडेट वेल्फेअर सोसायटी व राज्य सरकारची शिष्यवृत्ती जाहीर झाली. त्याबद्दल विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार केला. रिध्दी रावराणे कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप, स्टेट गर्व्हमेंट स्कॉलरशिप साक्षी बच्चे, कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप वैष्णवी ढेंगे, कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप दिक्षा लोहार, कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप श्रावणी अडसुळ, कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप शिष्यवृत्ती जाहीर झाल्याबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे,एस. के. धनवडे यांनी अभिनंदन केले. छात्रांना महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, मेजर सुनिता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

CADET WELFARE SOCTIY SCHOLARSHIP

तरुण भारत
मंगळवार, २८ जानेवारी २०२५

### विवेकानंद कॉलेज

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सेवानिवृत्त तसेच पीएच.डी. पदवी प्राप्त केलेल्या, सेट परीक्षा उत्तीर्ण व पुस्तक लेखक, प्रकाशक या गुणवंत प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. बी. टी. दांगट डॉ. विकास जाधव, कॅप्टन सुनिता भोसले, लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, प्रा संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, आर. बी. जोग आदी उपस्थित होते.

FELICITATION PROGRAM

तरुण भारत
मंगळवार २१ जानेवारी २०२५

# विवेकानंदच्या समिधा घुगरेची प्रजासत्ताक दिन परेडसाठी निवड



**कोल्हापूर :** दिल्ली येथे २६ व २७ जानेवारी २०२५ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित होणाऱ्या परेड व पंतप्रधान रॅलीसाठी विवेकानंद कॉलेजमधील एन.सी.सी. छात्र सिनिअर अंडर ऑफिसर समिधा घुगरे (बी.कॉम.भाग २) हिची निवड झाली आहे. या परेडसाठी तिचा दिल्ली येथे सराव सुरु आहे. समिधा ही ६ महाराष्ट्र गर्ल्स एन सी सी बटालियनमधून निवड झालेली एकमेव छात्र आहे. कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. कर्नल संधान मिश्रा, मेजर सुनिता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रा. सनी काळे, प्रबंधक रघुनाथ जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

SELECTION FOR REPUBLIC DAY PARADE

हॅलो प्रभात

# विवेकानंद महाविद्यालयाच्या छात्रांना एन.सी.सी. स्कॉलरशिप

कोल्हापूर : हॅलो प्रभात

एन.सी.सी. मुख्यालय दिल्ली तर्फे ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनच्या विवेकानंद कॉलेजच्या छात्रांना सन २०२४-२५ करीता एन.सी.सी. कॅडेट वेल्फेअर सोसायटी व राज्य सरकार शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. त्याबद्दल विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यामध्ये रिध्दी रावराणे - कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप, स्टेट गव्हर्मेंट स्कॉलरशिप



साक्षी बच्चे - कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप , वैष्णवी ढेंगे - कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप, दिक्षा लोहार - कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप, श्रावणी अडसुळ कॅडेट वेलफेअर सोसायटी स्कॉलरशिप यांचा समावेश आहे.

शिष्यवृत्ती जाहीर झाल्याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य मा. अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रबंधक श्री. एस.के.धनवडे यांनी अभिनंदन केले.

वरील छात्रांना महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, मेजर सुनिता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभले.

epaper.helloprabhat.in
05 Jun 2025 - Page 4

CADETS RECEIVED SCHOLARSHIP

बुधवार, १५ जानेवारी २०२५ MY कोल्हापूर पुढारी ७

# 'विवेकानंद'च्या निशाची आर्मी डे परेडसाठी निवड

**कोल्हापूर :** पुणे येथे होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवर सेना दिवस परेड एन.सी.सी. ट्रूपमध्ये विवेकानंद महाविद्यालयातील निशा अमर बजागे हिची निवड झाली आहे. तिला ६ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, मेजर सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रबंधक रघुनाथ जोग यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

SELECTION FOR ARMY DAY PARADE

तरुण भारत

शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५



# विवेकानंद कॉलेजची पन्हाळा पावनखिंड मोहीम

प्रतिनिधी

कोल्हापूर

मराठा साम्राज्याच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या घटनांची आठवण करून देणारी मोहीम व इतिहासाची साक्ष घालत पन्हाळा ते पावनखिंड परिसरातील ही आव्हानात्मक आणि प्रेरणादायी पदभ्रमंती विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी व एन.सी.सी. छात्रानी यशस्वीरित्या पूर्ण केली.

यावेळी शिवकाळातील पराक्रमाची साक्ष देणाऱ्या वीर शिवराय आणि बाजीप्रभू देशपांडे यांच्या शौर्याची आठवण ताजी केली.

या पदभ्रमंतीची सुरुवात पहाटे पन्हाळा किल्ल्यावरून झाली. जंगलातील वाटा, चढ–उतारांनी भरलेल्या डोंगर रांगा, तसेच अवघड मार्ग पार करत विद्यार्थ्यांनी व एन.सी.सी. छात्रानी अत्यंत शिस्तबद्ध प्रवास केला. पावनखिंड येथे पोहोचताच सर्वांनी बाजीप्रभू देशपांडे व बांदल मावळे यांच्या बलिदानास अभिवादन केले.

या पदभ्रमंती मोहिमेचे आयोजन एन.सी.सी. मुली विभागाच्या एन.सी.सी. मेजर सुनिता भोसले व आय. क्यू. ए. सी. प्रमुख डॉ. श्रुती जोशी यांचे मार्फत करण्यात आले होते. या मोहिमेस सह्याद्री प्रतिष्ठानच्या सदस्यांचे मार्गदर्शन लाभले. सह्याद्री प्रतिष्ठानचे मार्गदर्शक युवराज संभाजीराजे छत्रपती व अध्यक्ष हेमंत साळोखे, सदस्य शुभम कोळी, प्रविण केंबळे, योगेश वेटोळे, पार्थ जाधव, केतन कांबळे, राजवर्धन आडनाईक, अखिलेश गुरव यांचे सहकार्य लाभले. या पदभ्रमंतीच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. पी थोरात, ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे कमांडीग ऑफिसर कर्नल विक्रम नलवडे, एस.के. धनवडे यांचे प्रोत्साहन लाभले.

PANHALA PAVANKHIND TREK

Hellow Prabhat 24/12/2025

## "उत्कृष्टतेचा ध्यास क्षमतांना संधी देतो" — लेफ्टनंट सई जाधव



**विवेकानंद महाविद्यालयात लेफ्टनंट सई जाधव यांचा गौरवपूर्ण सत्कार**

कोल्हापूर, दि. २४ (प्रतिनिधी): पांडुरंग फिरिंगे

विद्यार्थीदशेतील अभ्यासक्रमासोबत विविध स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घेतल्यास व्यक्तिमत्त्व विकासाला दिशा मिळते आणि त्यातून करिअरसाठी संधींचे नवे दरवाजे खुलतात. मिळालेल्या संधींचे योग्य व्यवस्थापन करून बौद्धिक, भावनिक व मानसिक विकास साधता येतो. देशसेवा व समाजसेवेसाठी भारतीय सैन्यदल हे सर्वोत्तम व्यासपीठ असून राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA), सीडीएस, टेक्निकल एन्ट्री स्कीम, जज ॲडव्होकेट जनरल (JAG) आदी मार्गांतून कमिशन्ड ऑफिसर होता येते, असे प्रेरणादायी मत लेफ्टनंट सई जाधव यांनी व्यक्त केले.

त्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित विवेकानंद कॉलेज येथे आयोजित सत्कार समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. लेफ्टनंट सई जाधव या सत्कारमूर्ती महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले की, विद्यार्थीदशेतील हरहुन्नरीपणाला धैर्य व संयमाची जोड दिल्यास उर्जेला सकारात्मक दिशा देता येते आणि अंतर्सिद्धी साधता येते. परमपूज्य बापूजींच्या विचारांनी प्रेरित विवेकानंद शिक्षण संस्था व विवेकानंद कॉलेज हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे सर्वोत्तम व्यासपीठ आहे, यातूनच विद्यार्थ्यांनी उज्ज्वल करिअर घडवावे, असे त्यांनी आवाहन केले.

प्रास्ताविकात प्र. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी विवेकानंद शिक्षण केंद्र समाजाला ध्येयदृष्टी असलेले, मूल्याधिष्ठित विद्यार्थी घडवत असल्याचे स्पष्ट केले. पाहुण्यांचा परिचय व स्वागत परीक्षा विभागप्रमुख डॉ. जी. जे. नवाथे यांनी केले. लेफ्टनंट जितेंद्र भरगोंडा यांनी आभार मानले.

हा कार्यक्रम डॉ. श्रुती जोशी (आय.क्यू.ए.सी. प्रमुख), मेजर सुनिता भोसले, प्रबंधक श्री सचिन धनवडे यांच्या नियोजनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. सूत्रसंचलन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले.

या प्रेरणादायी कार्यक्रमास प्रा. गीतांजली साळुंखे, प्राध्यापकवर्ग, मेजर संदीप जाधव परिवार, एन.सी.सी. कॅडेट्स, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशसेवेची भावना आणि करिअरविषयक नवी प्रेरणा निर्माण झाली

FELICITATION OF LT. SAI JADHAV

तरुण भारत संवाद

शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५

## प्रतिक मिस्टर विवेकानंद, शरयू मिस विवेकानंद

### विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्याकडून अभिनंदन



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील मिस्टर विवेकानंद प्रतिक चौगुले व मिस विवेकानंद शरयू सुतार यांच्याबरोबर प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे. सध्याचा काळ कौशल्य विकासाचा असून अशा काळात विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाला आकार देण्यासाठी विविध स्पर्धेमध्ये सहभागी होणे महत्त्वाचे आहे. विवेकानंद कॉलेजने विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाला आकार देण्यासाठी, त्याच्या कलागुणांचा विकास होण्यासाठी विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा २०२५ चे केलेले आयोजन महत्वपूर्ण आहे. या स्पर्धेत प्रतिक चौगुले मिस्टर विवेकानंद तर शरयू सुतार मीस विवेकानंद झाली आहेत, ही कौतुकास्तप गोष्ट असल्याचे मत संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेजतर्फे आयोजित विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा २०२५ च्या सांगता समारंभात ते बोलत होते. प्राचार्य डॉ.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

प्रास्ताविक विवेकानंद महोत्सवाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तू व खाद्यपदार्थांच्या स्टॉलवरही भरपूर गर्दी होती. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी अभिवाचन, नाविन्यपूर्ण संशोधन, ॲड मॅड शो, रिल फ्लिक्स, डान्स मॅजिक या स्पर्धांचे तर दुसऱ्या दिवशी फन फेअर आणि मिस्टर ॲण्ड मिस विवेकानंद स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. फन फेअरचे उदघाटन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सिनेअभिनेत्री ज्योत्नाराजे गायकवाड तर मिस्टर ॲण्ड मिस विवेकानंद स्पर्धेसाठी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, रोहित कारगावे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धेतील अभिवाचन स्पर्धेसाठी डॉ. रमेश साळुंखे, प्रा. श्रीराम मोहिते, ॲडड मॅड शोसाठी एम. एम. शिंदे व मिताली गाठे यांनी, आयडियाथॉन साठी डॉ.संतोष मस्के व आदित्य सुर्वे, डान्स मॅजिक साठी विकास पोवार व गणेश इंडीकर, मिस्टर व मिस विवेकानंद साठी तिल्लोतमा देशमुख व शितल पाटील, रिल फ्लिक्ससाठी विष्णू वजार्डे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धांमध्ये कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, मुंबई येथील अनेक महाविद्यालये सहभागी झाली होती. वरील स्पर्धेतील सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

VIVEK MOHOTSAV PROGRAM

तरुण भारत संवाद

बुधवार, १७ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'च्या श्रीहरी शिपुगडे, वैष्णवी ढेंगे यांचे यश

**कोल्हापूर :** राष्ट्रीय थल सेना कॅम्पच्या माध्यमातून छात्रांच्या शारीरिक आणि मानसिक सक्षमतेची कसोटी आणि चाळण युनिट , बटालियन ,ग्रुप , डायरेक्टरेट आणि राष्ट्रीय पातळीवर घेतली जाते. ही सर्व शिबिर कोल्हापूर अमरावती आणि दिल्ली येथे होतात. विवेकानंद कॉलेजमधील सार्जंट श्रीहरी शिपूगडेने ऑबस्टॅकल व जेयुओ वैष्णवी ढेंगेने टेन्ट पिचिंग या प्रकारामधून दिल्लीच्या शिबिरापर्यंत यशस्वी वाटचाल केली. राष्ट्रीय छात्र सेनेच्या देशभरातील १३ लाख मुलांमधून २५० छात्रांची निवड केली जाते. यामध्ये कोल्हापूरच्या मुलांनी यशस्वीतेची पताका फडकवली आहे. या निवडीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, एनसीसी विभाग प्रमुख मेजर सुनिता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, कर्नल मानस दीक्षित, कर्नल विक्रम नलावडे, लेफ्टनंट कर्नल धनाजी देसाई पाच आणि सहा महाराष्ट्र बटालियन एनसीसी स्टाफ, पालक यांचे मार्गदर्शन लाभले.



वैष्णवी ढेंगे



श्रीहरी शिपुगडे

SELECTION OF CADETS FOR TSC DELHI

तरुण भारत
बुधवार, २५ सप्टेंबर २०२४



कोल्हापूर : दिल्ली येथील थल सैनिक कॅम्पसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांबरोबर प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रबंधक रघुनाथ जोग आदी.

# विवेकानंदच्या छात्रांचा दिल्ली कॅम्पमध्ये सहभाग

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील खालील तीन छात्रांची दिल्ली येथील थल सैनिक कॅम्पसाठी निवड झाली होती. ज्युनिअर अंडर ऑफिसर सेला रेगे, बी.एस्सी. बायोटेक भाग ३ हिने हेल्थ ॲण्ड हायजिन व टेंट पिचिंग या इव्हेंटमध्ये सहभागी झाली होती. सेला रेगे हिला टेंट पिचिंग या इव्हेंटमध्ये सुवर्णपदक मिळाले. थल सैनिक कॅम्पसाठी निवड झालेल्यांमध्ये सिनिअर अंडर ऑफिसर चेतन पवार, बी.कॉम.भाग ३ व सार्जण्ट सार्थक कुलकर्णी १२ वी आर्टस याची फायरींग इव्हेंटसाठी निवड झाली होती. वरील तीनही छात्र थल सैनिक कॅम्प् दिल्ली यशस्वीरित्या पूर्ण करुन परत आले. याबद्दल त्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या सौ शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गांवडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. या छात्रांना ५ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल मानस दीक्षित, कर्नल सुहास काळे, ६ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. यावेळी प्रबंधक रघुनाथ जोग उपस्थित होते.

FELICITATION OF TSC DELHI CADETS

तरुण भारत    गुरुवार, २४ जुलै २०२५

# आजऱ्याचे धनाजी देसाई एन. सी. सी. ट्रेनिंग ऑफिसर

प्रतिनिधी
आजरा

आजऱ्याचे सुपुत्र लेफ्टनंट कर्नल. धनाजी चंद्रकांत देसाई यांची एन. सी.सी. ग्रुप हेड क्वॉटर कोल्हापूरच्या ट्रेनिंग ऑफिसरपदी नियुक्ती झाली आहे. लेफ्टनंट कर्नल देसाई यांच्या रूपाने आजरा तालुक्याला प्रथमच ही संधी प्राप्त झाली आहे. गेली १९ वर्षे त्यांनी भारतीय सैन्य दलात मराठा लाईट इन्फट्रीचे ऑफिसर म्हणून काम पाहिले आहे.



देसाई यांनी सैन्यदलात जाऊ इच्छिणाऱ्या तरूणाईसमोर आदर्श ठेवला आहे. येथील व्यंकटराव हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेत असताना एन.सी.सी.जॉईन केली.याठिकाणी एन.सी.सी.चे 'अे' सर्टीफिकेट प्राप्त केले. येथील आजरा महाविद्यालयात ११ वी व १२ वीचे शिक्षण पूर्ण केले. तर कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजमध्ये पदवीचे शिक्षण घेत असताना एन. सी. सी. चे 'सी' सर्टीफिकेट प्राप्त केले. सैन्यात अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिलेल्या देसाई यांनी एन.सी.सी.च्या माध्यमातून बेस पक्का केला, आणि सैन्यदलात अधिकारी होण्याच्या दृष्टीने तयारी सुरू केली.

सैन्यातील अधिकारी पदाची परीक्षा २००५ मध्ये दिली. या परीक्षेत यश मिळाल्यानंतर त्यांनी चेन्नई येथे प्रशिक्षण पूर्ण केले आणि सन २००६ मध्ये भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट या पदावर ते रूजू झाले. देशभरात ठिकठिकाणी सेवा बजाविली.

PROFILE OF TRAINING OFFICER OF 6 MAH GIRLS BN NCC